**आदेश निशाणी क्र. १३**

( दिनांक २७ माहे फेब्रुवारी २०२६ रोजी पारीत )

०१. सदरच्या अर्जाद्वारे दावेकरी यांनी योग्य ती उपाययोजना करण्याअभावी त्याच्या पुराव्याची बाजु बंद करण्याचा न्यायालयाने केलेला आदेश रददबातल ठरवून, त्यांना पुरावा देण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी केलेी आहे.

०२. सदरच्या अर्जाला सहाय्यक सरकारी वकील यांनी प्रकरण जुने आहे, खूप दिवसांपासून अर्जदार पुरावा देत नाही. तेव्हा अर्ज नामंजूर करावा आणि मंजूर केला तर शासनावर अकारण वाढीव व्याज देण्याची वेळ येणार आहे. त्यामुळे तो नामंजूर करावा, अशी विनंती केलेली आहे.

०३. दावेक—याच्या वतीने वकील श्री. एस. बी. नेरे यांना ऐकले तर गैरअर्जदारासाठी सहाय्यक सरकारी अभियंता श्री. के. डी. कोळपे यांना ऐकले.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले असता हे सुस्पष्ट आहे की, सदर न्यायालयाने दिनांक ०९.०२.२०२६ रोजीच्या आदेशानुसार अर्जदार ही पुरावा सादर करण्यात कोणतेही स्वारस्व दर्शवित नसल्याने आणि न्यायालय अशा प्रकारचा संदर्भ अर्ज खारीज करु शकत नाहीतर ते गुणवत्तेवर निर्णयित करावा लागतो. या पार्श्वभूमीवर अर्जदाराच्या पुराव्याची बाजू बंद करुन तो गुणवत्तेवर निर्णयित करण्याचा आदेश केलेला आहे.

०५. सदरच्या अर्जाचे अवलोकन केले असता अर्जदाराने जरी

असा दाखल केलेला असला तरी ती जाणीवपूर्वक पुरावा सादर करण्यास टाळाटाळ केलेली नाही. परंतु त्यांनी न्यायालयासमक्ष हजर देखील होण्याची तसदी घेतलेली नाही. हे नाकारण्याचे कारण नाही की, त्यांचे वकील न्यायालयासमक्ष हजर होत आलेले आहे. परंतु तेव्हा पुराव्याचा टप्पा येतो. तेव्हा वकीलास उपस्थितीची कोणतीही बाधा होत नाही तर पक्षकाराने हजर होवून पूरावा द्यावा आणि त्या दावेक—याने त्याबाबत उदासिनता दाखविली. तेव्हा ही उदासिनता ना केवळ सहाय्यक सरकारी वकील यांनी युक्तीवाद केल्यानुसार शासनावर वाढीव भुर्दंड लागणार आहे. तेव्हा त्याबाबत निश्चितच न्यायालय योग्य त्या टप्प्यावर निवाडा पारीत करीत असताना लक्षात येईल. परंतु या टप्प्यावर ज्याअर्थी अर्जदार हा पुरावा सादर करण्यास इच्छूक आहे त्याअर्थी त्यांना ती संधी नाकारण्यास उचित होणार नाही. तेव्हा अर्ज मंजूर करताना खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे:

**आदेश**

अर्ज विनंतीप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे आणि त्यांच्याविरुद्ध पुरावा देण्याचा आदेश रद्दबातल ठरवून पुरावा सादर करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

Digitally signed by BHAGWAN DHONDIRAM PANDIT
Date: 2026.02.28 16:23:05 +0530

दिनांक: २७.०२.२०२६

**(भगवान धों. पंडित)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
भूम, जि. उस्मानाबाद.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P D F file order/ judgment are same word to word as per the original order/judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | R.H.Botre (Grade-II) |
| Name of Court | : | Civil Court Senior Division Bhoom Tq. Bhoom Dist.Osmanabad. |
| Order/ Judgment date | : | 27.02.2026 |
| Order/ Judgment signed by the Presiding Officer on | : | 27.02.2026 |
| Order/ Judgment uploaded on | : | 27.02.2026 |